# २ कृषि पणन संचालनालय

## राज्य शासनाच्या राज्यस्तरिय योजना

### १) ग्रामिण भागातील मध्यवर्ती सहकारी संस्थांना अर्थसहाय्य.

- योजनेची सुरुवात १४ मार्च १९९५ पासून
- मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्थांना ग्रामिण भागात ग्राहकोपयोगी वस्तुंचे वितरण करण्यासाठी व शाखा उघडण्यासाठी अर्थसहाय्य.
- अशा संस्थांना ग्रामीण भागात शाखा उघडण्यासाठी ८०० ते १००० चौरस फुट जागा मालकीची अथवा दिर्घ मुदतीच्या करारावर किंवा स्वत:च्या नावावर भाडे पावतीची जागा आवश्यक.
- सदरहू संस्था मागील तीन वर्षे सतत नफ्यात असणे आवश्यक.
- संस्थेचा लेखापरिक्षण वर्ग सातत्याने 'अ' किंवा 'ब' असणे आवश्यक.
- शासनाकडून प्राप्त होणाऱ्या भागभांडवलाच्या २० टक्के भागभांडवल संस्थेने उभारणे आवश्यक.
  - शासकीय भागभांडवल रु. १०,०००/- पर्यंत.
  - फर्निचर व फिचर्ससाठी कर्ज रु. २५,०००/-
  - व्यवस्थापकीय अनुदान रु. १०,००० तीन वर्षे विभागून (रु.४०००+४०००+२०००)
  - अशा संस्थांना जास्तित जास्त रु. १.३५ लाख अर्थसहाय्य एकदाच मंजूर करण्यात येईल.

### २) नागरी भागातील मध्यवर्ती व प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांना अर्थसहाय्य.

- योजनेस ३० मे १९९४ पासून सुरुवात.
- अशा संस्थांना डिपार्टमेंटल स्टोअर्स, लहान मोठ्या आकाराचे किरकोळ विक्री केंद्र उभारणीसाठी व विभागीय वितरण केंद्र उभारणीसाठी अर्थसहाय्य.
- अशा संस्था गेल्या तीन वर्षात सतत नफ्यात असणे आवश्यक.
- संस्थेचा लेखापरिक्षण वर्ग सातत्याने 'अ' किंवा 'ब' असणे आवश्यक.
- संस्थेच्या मालकीची अथवा दिर्घ मुदतीची किंवा करारावर भाड्याची जागा असणे आवश्यक.
- संस्थेने पूर्वीच शाखा उघडून पुन्हा त्याच शाखेसाठी अर्थसहाय्याची मागणी केल्यास अर्थसहाय्य प्राप्त होणार नाही.
- शासनाकडून प्राप्त होणाऱ्या भागभांडवलाच्या २० टक्के प्रमाणात भागभांडवल संस्थेने स्वत: उभारणे आवश्यक.
- ८ लाख व त्यावरील लोकवस्ती असलेल्या शहरात डिपार्टमेंटल स्टोअर्स उघडण्यासाठी विक्रीची जागा ४ हजार चौ.फुट आवश्यक व वार्षिक उलाढाल रु. ८० लाख आवश्यक.
  - अशा संस्थांना भागभांडवली अर्थसहाय्य रु. ६ लाखापर्यंत.
  - फर्निचर व फिचर्ससाठी कर्ज रु. १.५० लाखापर्यंत.
  - व्यवस्थापकीय अनुदान रु. ५० हजारापर्यंत तीन वर्षात विभागून.

- १ लाख ते ४ लाख लोकवस्ती असलेल्या शहरात डिपार्टमेंटल स्टोअर्स उभारणीसाठी विक्रीसाठी जागा कमीत कमी २ हजार चौ.फुट व वार्षिक उलाढाल रु. ४० लाख आवश्यक.

  - अशा संस्थांचे भागभांडवली अर्थसहाय्य रु. ३ लाखापर्यंत.
  - फर्निचर व फिचर्रसाठी कर्ज रु. १० हजार पर्यंत.
  - व्यवस्थापकीय अनुदान रु. ३० हजार पर्यंत तीन वर्षात विभागून.

- मोठ्या आकाराचे किरकोळ केंद्र उघडण्यासाठी विक्रीची जागा १ हजार चौरस फुट आवश्यक व वार्षिक उलाढाल रु. १२ लाख आवश्यक.

  - अशा संस्थेस भागभांडवल रु. १० हजारापर्यंत.
  - फर्निचर व फिचर्ससाठी कर्ज रु. २५ हजारापर्यंत.
  - व्यवस्थापकीय अनुदान १० हजारापर्यंत तीन वर्षात विभागून.

- लहान आकाराच्या किरकोळ विक्री केंद्राच्या उभारणीसाठी विक्रीची जागा ४०० चौ.फुट व वार्षिक उलाढाल ५ लाखापर्यंत आवश्यक.

  - अशा संस्थेस भागभांडवली अर्थसहाय्य २५ हजारापर्यंत.
  - फर्निचर व फिचर्रसाठी कर्ज रु. ५ लाखापर्यंत.
  - अनुदान रु. ५ हजारापर्यंत तीन वर्षात विभागून.

४) कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना अर्थसहाय्य.

- शासन निर्णय दिनांक १२/१०/२००७.
- शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी कृषि प्रक्रिया सहकारी संस्था (साखर कारखाने वगळून) अर्थसहाय्य.
- राज्यातील कृषि प्रक्रिया सहकारी संस्था मका व ज्वारीपासून जैविक साखर को-ऑप. इंडस्ट्रिज, उद्योग तसेच स्थापित कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना लागू.
- ऊस, कापूस, तेल व रेशीम वगळून शेतमालावर प्रक्रियेस लागू.
- प्रकल्प किंमत रु. ५ कोटीपर्यंतच्या प्रकल्पासाठी अर्थसहाय्य.
- प्रकल्प किंमतीच्या ४ टक्के भागभांडवल सहकारी संस्थांचे.
- प्रकल्प किंमतीच्या ३६ टक्के भाग भांडवल शासनाकडून.
- प्रकल्प किंमतीच्या ६० टक्के कर्ज शासन हमीवर रा.स.वि.नि. किंवा इतर वित्तीय संस्थांकडून.
- प्रकल्प तांत्रिकदृष्ट्या कार्यक्षम असल्याबाबत कृषि पणन मंडळाचे प्रमाणपत्र आवश्यक.

## राज्य शासनाच्या जिल्हास्तरिय योजना

१) मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्थांना व्यवस्थापकीय अनुदान.

- योजनेची सुरुवात १९९४-९५ पासून.
- अशा सहकारी ग्राहक संस्थांना ग्रामिण क्षेत्रात ग्राहकोपयोगी वस्तुंचे वितरण करण्यासाठी व्यवस्थापकीय अनुदान.

- ८०० ते १००० चौ.फुट जागा आवश्यक.
- सातत्याने मागील तीन वर्षे नफ्यात आवश्यक.
- संस्थेचा लेखापरिक्षण वर्ग सातत्याने 'अ' किंवा 'ब' आवश्यक.
- विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांना मंजूरीचे अधिकार.
- व्यवस्थापकीय अनुदान रु. १० हजार तीन वर्षे विभागून (४०००+४०००+२०००)
- भागभांडवली अंशदान जास्तित जास्त रु. १०,०००/-

## २) पणन सहकारी संस्थांना भागभांडवली अंशदान

- योजनेची सुरुवात १९९४-९५ पासून
- अशा संस्थांना व्यवसाय वृध्दीसाठी भागभांडवल
- अशा संस्थांची उलाढाल रु. १ कोटी असल्यास रु. १ लाखापर्यंत भागभांडवल
- अशा संस्थांची उलाढाल रु. २ कोटीच्या पुढे असल्यास ३ लाखापर्यंत भागभांडवल
- शासकीय भागभांडवल उपलब्ध होण्यासाठी संस्थेची अ, ब, व क वर्गात विभागणी.
  - अ वर्ग सहकार क्षेत्रातील पुढारलेल्या भागात येतो व अशा भागातील सहकारी संस्थांना १:१ प्रमाणात भागभांडवल दिले जाते.
  - ब वर्ग सहकार क्षेत्रातील अप्रगत असलेल्या भागात येतात व अशा भागातील सहकारी संस्थांना २:१ या प्रमाणात भागभांडवल दिले जाते.
  - क वर्ग सहकार क्षेत्रातील मागासलेल्या भागात येतात व अशा भागातील सहकारी संस्थांना १०:१ या प्रमाणात भागभांडवल दिले जाते.
  - विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांना मंजूरीचे अधिकार.

## ३) जिनिंग प्रेसिंग सहकारी संस्थांना भागभांडवली अंशदान

- योजनेची सुरुवात १९९४-९५ पासून
- अशा सहकारी संस्थांना शेतमाल खरेदी विक्री व प्रक्रियेच्या कामी मोठ्या प्रमाणात हाताळणीच्या सोयी होण्यासाठी अर्थसहाय्य
- सभासदांचे भागभांडवल १३.३३ टक्के अपेक्षित.
- २६.६७ टक्के शासकीय भागभांडवल
- ६० टक्के रक्कम वित्तीय संस्थांकडून कर्ज रुपाने उभे करणे अपेक्षित
- विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांना मंजूरीचे अधिकार

●●●